खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरुनगर

**प्रथम वर्ष कला**

सेमिस्टर दुसरे

# इतिहास

# भारतीय राष्ट्रीय आंदोलन (१९२०-१९५०)

# घटक ३ : प्रजासत्ताकच्या दिशेने

# घटक ३ : प्रजासत्ताकच्या दिशेने

# जमातवादाचा उदय आणि विकास

## प्रास्ताविक

जमातवाद शब्दाला इंग्रजीत कम्युनॅलिझम म्हणतात. इंग्रजांच्या भारतातील आगमनानंतर येथे ही संकल्पना रूढ झाली. पूर्वी भारतीय परंपरेत जात धर्म वंश व पंथ यांचा समावेश होता. जमात हा प्रकार रूढ नव्हता. इंग्रजांना स्वस्वार्थासाठी तो रूढ केला. साम्राज्यवाद विरोधी शक्तीचा सेफ्टी व्हॉल्व म्हणून इंग्रजांनी सुरूवातीला काँग्रेसला पाठींबा दिला. परंतू काँग्रेस इंग्रजांना अडचणीत आणणाऱ्या मागण्या करत राष्ट्रीय चळवळ प्रबळ करू लागल्याने इंग्रजांनी भारतीय समाजात जातीय फूट पाडण्याचा प्रयत्न सुरू केला.

पूर्वी भारतात हिंदूंची व नंतर मुस्लिमांची सत्ता होती. या सत्तांमध्ये संघर्ष झाला पण तो जमातवादी संघर्ष नव्हता. दोन्ही धर्मीय लोक आनंदाने एकत्र राहत होती. पण भारताची राष्ट्रवादी ताकद कमी करण्यासाठी या दोन्ही जमातींना एकमेकाविरोधात उभे करण्याचा इंग्रजांनी प्रयत्न केला. फोडा व राज्य करा या धोरणानुसार येथील हिंदू मुस्लिमांमधील वांशिक धार्मिक भाषिक आर्थिक भेदाचा स्वत:च्या फायद्यासाठी उपयोग केला. मुस्लिमांचा अंहकार चुचकारून त्यांच्यातील वेगळेपण त्यांच्या मनावर बिंबविले. त्यांच्या दारिद्र्याला हिंदू कारणीभूत आहेत हे मनावर ठसविले. भविष्यकालीन हिंदू वर्चस्वाचे भय निर्माण केले. त्यामुळे मुस्लिम समाजात फुटीरतावाद बळावला. त्यातून त्यांच्या संकुचित मागण्या तयार झाल्या त्याला इंग्रजांनी खतपाणी घातले. इंग्रजांच्या भेदनितीतून बंगालची फाळणी मुस्लिम लीगची स्थापना स्वतंत्र मतदारसंघ निर्मिती पाकिस्तानची मागणी व अखेरीस भारताची फाळणी या क्रमाने घटना घडल्या.

## मुस्लिम जमातवादाच्या प्रेरणा

काँग्रेस स्थापनेनंतर भारतात मुस्लिम जमातवाद वाढीस लागला. इंग्रजांच्या पाठिंब्याने मुस्लिम नेते व विचारवंतांनी त्यासाठी प्रयत्न केले. शेवटी वाढत्या फुटीरतावादातून देशाची फाळणी झाली. या मुस्लिम जमातवादाच्या प्रेरणा पुढीलप्रमाणे

### ०१. सर सय्यद अहमद खान यांचे कार्य

सर सय्यद हे मुळचे राष्ट्रीय प्रवृत्तीचे होते. पण १८८५ पासून ते जमातवादी बनले. जमातवाद वाढण्यास त्यांनी मोठा हातभार लावला. १८७७ मध्ये त्यांनी मुस्लिम समाजात पाश्चात्य शिक्षणाचा प्रसार व्हावा यासाठी अलीगढला मोहमेडन अँग्लो ओरिएंटल का^लेज स्थापन केले. त्याचे पुढे अलीगढ विद्यापीठात रूपांतर झाले व ते मुस्लिम जमातवादी राजकारणाचे मुख्य केंद्र बनले. हिंदू मुस्लिम ही दोन राष्ट्रे आहेत. एवढेच नव्हे तर विरोधी राष्ट्रे आहेत  असे १८८८ मध्ये मीरत येथे भाषणात सर सय्यद म्हणाले. यावेळी त्यांनी काँग्रेसवर टीकाही केली. काँग्रेस हिंदूंची संघटना असून मुस्लिमांनी त्यापासून दूर रहावे व आपल्या प्रगतीसाठी व अस्तित्वासाठी स्वतंत्र चळवळ चालवावी असे आवाहनही केले. यातून जमातवादाला चालना मिळाली.

**०२. प्राचार्य बेकची कामगिरी**

चाणाक्ष इंग्रज बेक अलिगढ विद्यापीठाचे प्राचार्य होते. त्यांनी मुस्लिम फुटीरतावादाला चालना दिली. राष्ट्रवादी सर सय्यद यांना जमातवादी बनविले. इंग्रज सत्ता जास्तकाळ टिकावी यासाठी हिंदू मुस्लिमात फूट पाडण्यास प्रयत्न केले. इंग्रजांशी एकनिष्ठ राहण्यात मुस्लिम हित असल्याचे मुस्लिम नेत्यांच्या मनावर बिंबविले. १८९३ मध्ये सर सय्यद करवी मोहमेडन अँग्लो ओरिएन्टल डिफेन्स असोसिएशनची स्थापना केली. या संघटनेच्या उद्देशात बेक म्हणतो या देशाला अयोग्य अशी लोकशाही शासनपध्दती मागणाया चळवळखोरांच्या विरूध्द मुस्लिम व इंग्रज यांनी एक होणे गरजेचे आहे. म्हणुन आम्ही सरकारशी निष्ठा आणि इंग्रज मुस्लिम संघटन यांचा पुरस्कार करीत आहोत. भरतात लोकशाही आल्यास हिंदूंच्या हुकूमतीत मुस्लिमांना रहावे लागेल अशी भीती बेक दाखवित असे. चार्लस ब्रॅडलॉ या उदारमतवादी ब्रिटिश संसद सदस्याने भारतात लोकशाही संस्था स्थापन करण्यात याव्यात असे बील मांडले तेव्हा बेकने मुस्लिमांच्यावतीने संसदेला अर्ज पाठवुन हिंदुस्थान हे एक राष्ट्र नसल्याने येथे लोकशाही संस्थांचा उपयोग होणार नाही असे कळविले. बेकच्या अशा उद्योगामुळे अलीगढ मधून जमातवादी प्रवृत्ती जोपासल्या जाऊ लागल्या व शासनानेही मुस्लिमधार्जिणे धोरण स्विकारून पुढे फाळणी केली.

**०३. बंगालची फाळणी**

हिंदू मुस्लिमात फूट पाडणे व मुस्लिमांना राष्ट्रीय प्रवाहापासून दूर ठेवणे हे इंग्रजांचे धोरण होते. त्यानुसार कर्झनने १९०५ मध्ये बंगालची फाळणी केली. ही प्रदेशाची फाळणी नव्हती तर हिंदू मुस्लिम समाजाची फाळणी होती. फाळणीमागे आपण मुस्लिम हित जपतो हे इंग्रजांना दाखवायचे होते. पूर्व बंगाल व आसाम या नव्या प्रांतात अधिकारपदे मुस्लिमांना मिळणार असे कर्झनने जाहीर केले. फाळणी देशविघातक आहे हे ओळखुन हिंदूंनी विरोध केला पण त्यामुळे इंग्रज आपले हित पाहतात तर हिंदू हितशत्रू आहेत असे मुस्लिमांना वाटू लागले. आपण इंग्रज राज्यातच सुरक्षित आहोत असे वाटून मुस्लिम हिंदूपासून फटकून वागु लागले

**०४. विभक्त मतदारसंघ व जमातवाद**

बंगाल फाळणी नंतर मतदारसंघबाबत विचार सुरू झाला. मुस्लिम काँग्रेसकडे जाणार नाहीत ग. ज. मिंटोने अधिकायांमार्फत सिमल्यास मुस्लिम शिष्टमंडळाने भेट घेऊन राजकीय मागण्या मांडण्यास सांगितले. त्यानुसार त्यावेळचे अलिगढचे प्राचार्य आर्चबोल्ड यांने तयारी व मसुदा बनविला. आगाखान नेतृत्त्वात मुस्लिम शिष्टमंडळाने मिंटोस भेटून मुस्लिम ही भारतातील वेगळी अशी प्रभावी जमात आहे तिला विभक्त मतदारसंघ दिल्याशिवाय मुस्लिमांचे हितरक्षण शक्य नाही अशी भूमिका मांडली. मिंटोने मागण्यांशी सहमत असल्याचे सांगत मंडळाला पार्टी दिली. पुढे १९०९च्या कायद्याने स्वतंत्र मतदारसंघ तरतुद केली. यामुळे मुस्लिम हिंदूपासून वेगळे आहेत यावर शिक्कामोर्तब झाले.

**०५. मस्लिम लीग स्थापना**

मिंटोने शिष्टमंडळाला प्रोत्साहन दिल्याने मुस्लिम आत्मविश्वास वाढला. कॉंग्रेस व भारतीयांपेक्षा मुस्लिम जमात म्हणून आपले वेगळे हितसंबंध असून ते जोपासण्यासाठी स्वतंत्र संघटना स्थापण्याचा विचार बंगाली मुस्लिमांनी उचलून धरला. ३० डिसेंबर १९०६ रोजी ढाक्यास एक बैठक भरली त्यात मुस्लिम लीग या राजकीय संघटनेची स्थापना करण्यात आली. मुस्लिमांना संघटीत करणे त्यांच्यात इंग्रजनिष्ठा निर्माण करणे व मुस्लिम हितसंबंध जोपासने ही त्या संघटनेची उद्दिष्टे होती. लीग स्थापनेमुळे व नबाब सलीमुल्लाखान मुस्ताक हुसेन विकार उलमुल्क या नेत्यांकडून मुस्लिम जमातवादास चालना मिळाली इंग्रज सत्ता कायम रहावी कारण ती गेल्यास हिंदू वर्चस्वात रहावे लागेल अशी त्यांनी कायम मांडणी केली.

### ०६. महमंद इक्बाल व चौधरी रहमतअली प्रेरणा

इक्बालांनी काव्यात्मक अभिव्यक्तीतून मुस्लिम वेगळेपणा सतत मनावर ठसविला. १९३० मध्ये अलाहाबाद अधिवेशनात मुस्लिम राष्ट्र कल्पना मांडली तर रहमतअलीने पाक निर्मितीचे बीज रोवले. १९३३ च्या अधिवेशनात नाऊ ऑर नेव्हर ही पुस्तिका प्रकाशित करून त्यात पाकिस्तान शब्द प्रथम वापरला.

# घटक ३ : प्रजासत्ताकच्या दिशेने

## ब) व्दिराष्ट्रवाद आणि फाळणी

१९३७ पर्यंत मुस्लिम जमातवादी राजकारणाची दिशा अलगतेकडे निर्देश करणारी होती. पण स्वतंत्र राष्ट्राचा विचार त्यात नव्हता. महमंद इक्बाल हा पाकिस्तान कल्पनेचा जनक आहे. पहिल्या गोलमेज परिषदेनंतर १९३१ मध्ये लीग नेत्यांची इक्बाल अध्यक्षतेत अलाहाबादला बैठक झाली. त्यात त्याने पाकिस्तानची कल्पना मांडली. वायव्य भारतात स्वतंत्र मुस्लिम राज्य निर्माण करावे अशी त्याची मागणी होती. पंजाब वायव्य सरहद्द सिंध बलुचिस्तान एकत्र करून नव्या राज्याची त्याची योजना होती. त्याच्या या कल्पनेतूनच मुस्लिमांसाठी स्वतंत्र राष्ट्र हा विचार बळावत गेला. दुसया गोलमेज परिषदेत पाक निर्मितीबाबतच्या योजनापत्रकाच्या प्रती वाटण्यात आल्या.

पाकिस्तान या कल्पनेला केंब्रिज विद्यापीठात शिकणाऱ्या रहमतअली या विद्यार्थ्याने मूर्तरूप दिले. त्यानेच पाकिस्तान हे नाव (Punjab = P, Afganistan = A, Kashmir = K, Sindh = S, Baluchistan = Stan ) तयार केले. हिंदू मुस्लिम दोन जमाती नसुन स्वतंत्र वंश धर्म संस्कृती परंपरा असणारी ती दोन राष्ट्रे आहेत. अशा रहमतअलीच्या विचारातून पाकिस्तानचा पाया बळकट झाला. पण १९३३ मध्ये रहमतअलीने मांडलेली पाक ची कल्पना अवास्तव मानली गेली. पण १९३८ पासून लीग राजकारणाचा प्रवाह पाक दिशेने वाहू लागला मुस्लिम जमात ही केवळ अल्पसंख्य समाज न राहता भारतीय समाजातील एक स्वतंत्र वेगळे असे राष्ट्र मानले जाऊ लागले. भारतात दोन राष्ट्रे जगतात. एक मुस्लिमांचे व दुसरे हिंदूंचे. अशा स्वरूपात व्दिराष्ट्रवादाचा विचार मांडला जाऊ लागला.

जीनांनी व्दिराष्ट्रवादाचा पुरस्कार केला. पूर्वी जीना हिंदू मुस्लिम ऐक्याचे पुरस्कर्ते होते ते आता मुस्लिम जमातवाद व स्वतंत्र राष्ट्राचे पुरस्कर्ते झाले. लीग च्या १९४० मधील लाहोर अधिवेशनात जीनांनी अध्यक्षीय भाषणातून व्दिराष्ट्रवाद मांडला. हिंदू मुस्लिम हे दोन धार्मिक गट नसून त्यांच्या चालीरिती त्यांची श्रध्दास्थाने त्यांच्या प्रेरणा त्यांचा इतिहास संस्कृती सर्व भिन्न आहेत. इतके भिन्न आहेत की ती दोन राष्ट्रे भासावित. तेव्हा ती एकत्र नांदणे अशक्य आहे. तेव्हा त्यांनी स्वतंत्रपणे आपल्या मातृभूमीची सेवा करावी असा विचार मांडला

थोडक्यात जीनांनी मुस्लिम जमात स्वतंत्र राष्ट्र असल्याचे आग्रही प्रतिपादन करत शांततेसाठी ही निर्मिती व अल्पसंख्यांकांचे प्रश्न सोडविण्यास आवश्यक असल्याचा विचार मांडला.

### मुस्लिम लीग जमातवादी राजकारणाचा प्रवाह

असहकार चळवळ समाप्तीनंतर हिंदू मुस्लिम ऐक्य भंगले व देशात हिंदू मुस्लिमात तणाव निर्माण झाला. १९२३ अखेरीस मुस्लिमांचे धर्मांतराचे प्रयत्न व त्यास प्रत्युत्तर म्हणून हिंदुत्ववाद्यांच्या शुध्दी व संघटना चळवळीमुळे तणावात भर पडली.

अविवेकी सनातनी प्रवृत्तीतून १९२३ ते २७ काळात अनेक दंगली झाल्या. लाहोर मधील दंगलीत ४५० ठार तर ५००० जखमी झाले. राष्ट्रीय प्रवृत्तीचे मुस्लिम नेते जमातवादी बनु लागले. १९२५ मध्ये जीना व अली बंधु जमातवादी बनले. १९२३ नंतर जीना नेतृत्त्वात लीगचे पुनरूज्जीवन होऊन लीगने प्रतिगामी व संकुचित धोरणे राबवायला सुरूवात केली त्यामुळे काँग्रेस लीग दुरावा वाढत जाऊन यानंतर क्वचितच दोन्ही पक्ष एकत्र आले. १९२७मध्ये सायमन कमिशन दौयावर काँग्रेसने बहिष्कार टाकला. या बाबत लीग मध्ये मात्र फुट पडली. १९२८ मध्ये भारतास घटना तयार करण्यासाठीच्या सर्वपक्षीय परिषदेत काँग्रेस व लीग सामील झाली. मोतीलाल नेहरू अध्यक्षतेत घटनेचा मसूदा तयार करण्यास एक समिती स्थापली तिचा अहवाल नेहरू रिपोर्ट नावाने प्रसिध्द आहे. या रिपोर्टला राष्ट्रवादी मुस्लिमांनी पाठिंबा दिला पण जीनांनी विरोध करत दुरूस्तीसाठी १४ मुद्दे सुचविले.

जीनांच्या १४ मुद्दयात मुस्लिमांसाठी स्वतंत्र मतदारसंघ मध्यवर्ती कायदेमंडळात राखीव जागा मध्यवर्ती व प्रांतिक मंत्री मंडळात एकतृतीयांश राखीव जागा याबरोबरच मुस्लिम समाज हितसंबंधाशी निगडीत विधेयक तीन चतुर्थांश मुस्लिम सभासदांनी नाकारल्यास ते रद्द व्हावे व प्रांतांना स्वायत्तता दयावी या मागण्यांचा समावेश होता. पण काँग्रेसने १४ मुद्दे नाकारले.

१९३० मध्ये संपूर्ण स्वातंत्र्यासाठी काँग्रसने कायदेभंगाची चळवळ हाती घेतली. तेव्हा हा आपल्याला हिंदूंचे अंकित करण्याचा डाव आहे असा लीगने प्रचार करून कायदेभंग चळवळीला विरोध केला. इंग्रज मैत्रीचे धोरण स्विकारले. याच दरम्यान पहिल्या गोलमेज परिषदेवर काँग्रेसचा बहिष्कार होता पण लीगने भाग घेतला. १९३२ मध्ये म^कडोनाल्डच्या जातीय निवाडयाने जातवार मतदारसंघाला मान्यता दिली. नाव्हेंबर १९३२ मध्ये एकता परिषद भरली त्यात जातीय समस्येवर तोडगा काढण्यास लीगने नकार दिला.

१९३५ च्या कायद्याने मुस्लिमांना स्वतंत्र मतदारसंघ मिळाले होते. त्यामुळे हिंदू मुस्लिमात दरी वाढत गेली. १९३५ कायद्यानुसार १९३७ मध्ये प्रांतिक निवडणुका झाल्या. काँग्रेस व लीग विरोधात लढले. काँग्रेसला ८ प्रांतात सत्ता मिळाली. लीगला कोठेच नाही. त्यामुळे स्वतंत्र जमात म्हणून आपल्याला राजकीय भवितव्य नाही हे लक्षात येऊन लीग उव्दिग्न झाली. काँग्रेसला मुस्लिमांनी सहकार्य केले हे लीगला सहन झाले नाही. जीनांनी काँग्रेसवर टीका केली. मुस्लिमांचे प्रतिनिधित्व केवळ मुस्लिम लीगच करेल अशी भूमिका त्यांनी घेतली. काँग्रेस हिंदूंची संघटना असून त्यांना हिंदीस राष्ट्रभाषा करायचे आहे व असे झाल्यास उर्दूची गळचेपी होईल. काँग्रेसचे वंदे मातरम् गीत मुस्लिम विरोधी आहे. अशी टीका जीनांनी केली. मुस्लिमांना काँग्रेस प्रभावातून दूर करून लीग प्रभावात आणण्यास सतत प्रयत्न केला.

ग्रामीण भागात हिंदू मुस्लिमांनी जातीयता सोडून राष्ट्रीय दृष्टीने एकत्र यावे यासाठी नेहरूंनी जनता संपर्क मोहिम काढली. तेव्हा मुस्लिम धर्म संकटात आहे अशी ओरड करत लीगने स्वधर्म स्वहित व स्वसंरक्षणासाठी मुस्लिमांनी लीगमध्ये यावे असे आवाहन जीनांनी केले. प्रांतिक स्वायत्ततेची अंमलबजावणी मुस्लिमांची निराशा करणारी ठरल्याने मुस्लिम प्रांतांचे संघराज्य व बिगर मुस्लिम प्रांतांचे संघराज्य असे भारताचे दोन संघराज्यात विभाजन

करण्यात यावे अशी लीगने मागणी केली. त्यातुन जीनांची लोकप्रियता व जमातवाद वाढू लागला. यावेळी मुस्लिम संघराज्याच्या सीमा वाढविण्यास रहमतअलीने प्रस्ताव मांडत त्यात उस्मानिस्तान हैद्राबाद व बंग इ इस्लाम बंगाल व आसाम यांचा समावेश करावा अशी मागणी केलूी.

महायुध्दात इंग्लंडने भारतालाही गोवल्याने त्याचा निषेध करत काँग्रेसच्या प्रांतिक मंत्रीमंडळांनी राजीनामे दिले व इंग्रज युध्द प्रयत्नाशी असहकार पुकारला लीगने याउलट भूमिका घेतली. काँग्रेस मंत्रीमंडळांनी राजीनामे दिल्याने बहुसंख्यकांच्या अंमलातून मुक्ती मिळाल्याचे सांगत लीगने २२ डिसेंबर १९३९ हा दिवस मुक्तीदिन म्हणून साजरा केला.

जुलै १९४० मध्ये जीनांनी लीगच्या वतीने ग. ज. ला पत्र दिले. त्यात पुढील मागण्या केल्या. मुस्लिमांना अमान्य असणारी घटना लागू करू नका. ग. ज. कार्यकारी मंडळात व युध्द समितीत हिंदूंच्या बरोबरीने मुस्लिमांना स्थान दया. काँग्रेसचे सर्व प्रतिनिधी हिंदू म्हणून गृहित धरावेत. मुस्लिम प्रतिनिधी पाठविण्याचा अधिकार लीगला आहे. असा जमातवादी दृष्टीकोन स्विकारला. मोबदल्यात इंग्रजांना युध्दासाठी मदत करण्याचे जाहीर केले.

१९४० पासून लीगने वेगळी चूल मांडली स्वातंत्र्य चळवळीपासून स्वत:ला अलिप्त ठेवले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी काँग्रेसने भारत छोडोचा ठराव पास केला. तेव्हा लीगने ४२ च्या चलेजाव चळवळीस विरोध केला. काँग्रेसचा हिंदू राज्यासाठीचा कट अशी चळवळीवर टीका केली. इंग्रजांना जायचे असेल तर त्यांनी देशाची फाळणी करा व जा असा ठराव लीगने पास केला. त्यातून फाळणीच्या दिशेने वाटचाल सुरू झाली. दुसया महायुध्द काळात पाक मागणीबाबत तडजोडीसाठी प्रयत्न झाला. त्यातून राजाजी योजना देसाई लियाकतअली योजना पुढे आल्या पण लीग व जीनांनी त्या फेटाळल्या. सप्टेंबर १९४४ मध्ये पाक शिवाय काहीही स्विकारणार नाही असे त्यांनी जाहीर केले.

दुसरे महायुध्द संपले. इंग्लंडमध्ये निवडणुका होऊन सत्तांतर झाले. मजूर पक्षाचा अॅटली पंतप्रधान झाला. भारतातील सत्तांतरास गती देण्यासाठी मार्च १९४६ मध्ये कॅबीनेट मिशन भारतात आले. त्यांनी आपल्या त्रिमंत्री योजनेत लीगची स्वतंत्र राष्ट्राची मागणी स्विकारली नाही. त्रिमंत्री योजनेनुसार जुलै १९४६ मध्ये घटना परिषदेच्या निवडणुका झाल्या. काँग्रेसला २११ व लीगला ७३ जागा मिळाल्या. काँगेसला बहुमत मिळाल्याने लीग चीडली व लीगने त्रिमंत्री योजना नाकारली. जीनांनी फाळणीसाठी प्रत्यक्ष कृती योजना हाती घेतली. प्रत्यक्ष कृती म्हणजे हिंदूंच्या कत्तली. १६ ऑगस्ट प्रत्यक्ष कृती दिन पाळायचे ठरले. बंगालचे मुख्यमंत्री सुहावर्दी यांनी प्रत्यक्ष कृती दिना साठी सार्वत्रिक सुट्टी जाहीर केली. १७ व १८ आ^गस्ट १९४६ रोजी कलकत्त्यात दंगली झाल्या. त्यात ५००० ठार १५००० जखमी तर १लाख लोक बेघर झाले.

२ सप्टेंबर १९४६ रोजी हंगामी सरकार स्थापन झाले. पंडित नेहरू पंतप्रधान झाले तो दिवस लीग ने शोकदिन म्हणून साजरा केला. पुढे लीग हंगामी सरकारमध्ये सहभागी झाले. पण लीगने अडवणुकीची भूमिका घेतली. घटना समिती परिषदेवर लीगने बहिष्कार टाकला. त्यामुळे पेचप्रसंग निर्माण झाला तसेच हिंदू मुस्लिमांमधील कटुताही वाढली.

जून १९४८ पूर्वी भारत सोडण्याची ॲटली यांनी घोषणा केली. त्यानुसार माऊंटबॅटन यांनी योजना आखण्यास सुरूवात केली. लीगने यावेळी आपल्याला जास्त प्रदेश मिळावा यासाठी असाम पंजाब सरहद्द प्रांत व सिंधमध्येही प्रत्यक्ष कृतीचे थैमान सुरू केले. माऊंटबॅटन यांनी चर्चा करूनही जीना फाळणीवर ठाम राहिले. अखेर ३ जून १९४७ रोजी माऊंटबॅटन यांनी फाळणीची योजना जाहीर केली. लीगने पंजाब व बंगाल फाळणीस मान्यता देऊन योजना स्विकारली. जीनांच्या दुराग्रही भूमिकेमुळे दंगली उसळल्या होत्या. हंगामी सरकारमध्ये पेचप्रसंग निर्माण झाला होता. त्यामुळे नाइलाजास्तव कॉँग्रेसला ही योजना स्विकारावी लागली. अखेरीस १४ आ^गस्ट १९४७ रोजी सिंध बलुचिस्तान वायव्य सरहद्द प्रांत सिल्हेट विभाग पूर्व बंगाल व पश्चिम पंजाब यांचे मिळुन पाकिस्तान हे स्वतंत्र राष्ट्र उदयाला आले.

**मुस्लीम लीग ( १९०६ )**

**मुस्लीम लीग** स्थापनेस कारणीभूत घटक

१. जमातवादाचा विकास
२. सर सय्यद अहमद खान
३. मिंटो
४. बेक
५. आर्चबोल्ड
६. बंगालची फाळणी
७. हिंदुविषयी भीती

**लीगची स्थापना**

मिंटोने मुस्लिम शिष्टमंडळाला प्रोत्साहन दिले. प्रिन्स आगाखान व अलिगढ का^लेजचे सचिव मोहसीन उल मुल्क यांच्या नेतृत्त्वाखाली एक ३५ सदस्यांचे शिष्टमंडळ १ ऑक्टोबर १९०६ रोजी मिंटअेस भेटले. हे मुस्लिम एकूण मुस्लिमांचे प्रतिनिधी नसले तरी इंग्रजांना कॉँग्रेसपासून दुर राहणारा ब्रिटिश मुस्लिमांचा एक गट तयार करायचा होता. या शिष्टमंडळाने मिंटोकडे अनेक मागण्या केल्या. या मागण्यास मिंटोने अनुकूलता दाखविली. यामुळे मुस्लिमांचा आत्मविश्वास वाढला. त्यातून कॉंंग्रस व भारतीयांपेक्षा मुस्लिम जमात म्हणून आपले वेगळे हितसंबंध असून ते जोपासण्यासाठी स्वतंत्र संघटना स्थापण्याचा विचार बंगाली मुस्लिमांनी उचलून धरला.

डिसेंबर १९०६ मध्ये मोहमेडन एज्युकेशनल कॉन्फरन्स चे अधिवेशन ढाक्का येथे भरले. ढाक्क्याचे नवाब मोहसीन उल मुल्क यांनी मुस्लिम नेत्यांना ढाक्क्यास बोलाविले होते नवाबांच्या अध्यक्षतेत ३० डिसेंबर १९०६ रोजी एक बैठक झाली. आगाखान यांनी या बैठकीसाठी पुढाकार घेतला होता. मुस्लिमांसाठी स्वतंत्र राजकीय संघटना अर्थात मुस्लीम लीग स्थापन करण्याचा प्रस्ताव या बैठकीत पास झाला. लीग स्थापने मुळे व नबाब सलीमुल्लाखान मुस्ताक हुसेन विकार उलमुल्क या नेत्यांकडून मुस्लिम जमातवादास चालना मिळालीइंग्रज

सत्ता कायम रहावी कारण ती गेल्यास हिंदू वर्चस्वात रहावे लागेल अशी त्यांनी कायम मांडणी केली.

**लीगची उद्दीष्टे**

**मुस्लीम लीगची स्थापना करताना लीगची जी उद्दिष्टे ठरविण्यात आली ती पुढीलप्रमाणे...**

१. इंग्रज राजवटीविषयी मुस्लिम समाजात इंग्रजनिष्ठा निर्माण करणे.

२. इंग्रज सरकारविषयक गैरसमज दुर करणे.

३. भारतीय मुस्लिमांच्या हितसंबंधाचे संरक्षण व संवर्धन करणे.

४. मुस्लिम समाजाच्या मागण्या वेळोवेळी इंग्रजांपुढे मांडणे.

५. अन्य जातीजमातींविषयी मुस्लिमांमध्ये व्देष पसरणार नाही याची काळजी घेणे.

# घटक ३ : प्रजासत्ताकच्या दिशेने
# क) आझाद हिंद सेना

**प्रास्ताविक**

व्हॉईसरॉय वरील बॉम्बहल्ला प्रकरणी इंग्रजांना रासबिहारी बोस हवे होते. पलायन करून क्रांतिकारक रासबिहारी बोस १९१५ मध्ये जपानला गेले. आग्नेय आशियातील भारतीयांना संघटीत होण्याचे त्यांनी आवाहन केले. त्यानुसार १९२४ मध्ये इंडियन इंडिपेन्डन्स लिगची स्थापना केली. १९३९ मध्ये दुसरे महायुध्द सुरू झाले. जपानने अमेरिकेच्या पर्ल हार्बरवर हल्ला करत युध्दात प्रवेश केला. महायुध्दात इंग्लंडच्या बाजुने लढणाया हिंदी शिपायांना कैद करत तुरूंगात टाकले. जपानच्या तुरूंगातील ४०००० हिंदी युध्दकैद्यांना संघटित करून रासबिहारी बोस यांनी कॅप्टन मोहनसिंग सहकार्याने जपान मदतीने मार्च १९४२ मध्ये आझाद हिंद फौजेची स्थापना केली. या फौजेचे नेतृत्व पुढे सुभाषचंद्र बोस यांच्याकडे दिले. त्यांनी सेनेत नवचैतन्य निर्माण केले.

**सुभाषचंद्र बोस यांचे पूर्ववृत्त**

सुभाषचंद्र बोस यांचा जन्म २३ जानेवारी १८९७ रोजी ओरिसा प्रांतातील कटक येथे झाला. त्यांचे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण जन्मगावीच झाले. महाविद्यालयीन शिक्षण कलकत्त्यास झाले. तत्त्वज्ञान विषयात ते बी. ए. झाले. काही प्रमाणात लष्करी शिक्षणही घेतले. १९२० मध्ये सुभाषचंद्र बोस आय. सी. एस. झाले. अधिकारी म्हणून रूजुही झाले पण जेव्हा इंग्लंडच्या राजसिंहासनाशी एकनिष्ठ राहण्याची शपथ घेण्याची वेळ आली तेव्हा त्यांनी त्यास नकार दिला. उच्च अधिकारपद न स्विकारता राष्ट्रभक्तीने प्रेरीत होऊन त्यांनी स्वातंत्र्य लढयात १९२१ मध्ये भाग घेतला. गांधींची असहकार चळवळ यावेळी सुरू होती. गांधी विचार त्यांना पूर्णत: पटणारे नव्हते. १९२३ मध्ये मोतीलाल नेहरू व सी. आर दास यांनी स्वराज्य पक्ष स्थापन केला तेव्हा त्यांनी दासांचे शिष्यत्व पत्करून स्वराज्य पक्षाच्या कार्यात सामिल झाले. ते जहाल विचारांचे होते. पाश्चिमात्य विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. दास व नेतांजीच्या कार्यामुळे स्वराज्य पक्षास कलकत्ता कार्पोरेशन निवडणुकीत यश मिळाले व दास कलकत्त्याचे मेयर व नेताजी मुख्य कार्यकारी अधिकारी बनले. बंगाल मधील क्रांतीकारकांशी त्यांचे संबंध होते. सरकारच्या ते लक्षात येताच त्यांना अटक करून १९२४ मध्ये मंडालेच्या तुरूंगात ठेवण्यात आले. त्यांच्या अनुपस्थितीत बंगाली लोकांनी त्यांची बंगालच्या कायदे मंडळावर निवड करून त्यांचा सन्मान केला. त्यांची प्रकृती बिघडल्याने १९२७ मध्ये सरकारला नेतांजींची कैदेतुन सुटका करावी लागली. सायमन कमिशन विरोधी काळात नेताजी स्वस्थ बसले नाही. बंगालात सायमन कमिशन विरोधी वातावरण त्यांनी तयार केले. काँग्रेस मधील तरूण गटाचे नेतृत्व नेताजींकडे आले. त्यामुळे व स्वातंत्र्य लढयातील योगदानामुळे त्यांना १९३८ मध्ये काँग्रेसचे अध्यक्षपद मिळाले. दुसऱ्या वर्षीही ते अध्यक्ष म्हणून निवडून आले. पण गांधींशी त्यांचे मतभेद होते. सहा महिन्यात इंग्रजांनी भारतास स्वातंत्र्य दयावे अन्यथा

सत्याग्रह करू अशी त्यांची भूमिका होती. मवाळ काँग्रेसवाद्यांना हे मान्य नसल्याने सुभाषचंद्र बोस व काँग्रेस नेत्यात वैचारिक मतभेद निर्माण झाले. त्यामुळे सुभाषचंद्र बोसांनी काँग्रेसचा राजीनामा देऊन फा^रवर्ड ब्ला^क पक्ष स्थापन केला. स्वातंत्र्य चळवळीत नव्या पर्वाला सुरूवात झाली. सरकार विरोधात उघडपणे लढा देण्याचे आवाहन त्यांनी देशबांधवांना केले. १९३९ मध्ये दुसरे महायुध्द सुरू झाले. यावेळी लढा तीव्र करावा असे नेतांजींचे मत होते. इंग्रजांनी भारत सुरक्षा कायद्यानुसार जुलै १९४० मध्ये नेतांजींना अटक केली. त्यांनी तुरूंगात उपोषनाला सुरूवात केल्याने ५ डिसेंबर १९४० रोजी त्यांची तुरूंगातुन सुटका करून राहत्या घरी नजरकैदेत ठेवले. नेताजी १७ जानेवारी १९४१ रोजी कैदेतुन निसटले. हे सरकारच्या दहा दिवसांनी लक्षात आले. नेताजी वेगवेगळी नावे व वेष धारण करून  भारताबाहेर पोहोचले. झियाउद्दिन नाव धारण करून पेशावर अफगाणीस्तान मार्गे रशियास गेले. २८ मार्च रोजी मास्कोहू न विमानाने बोस जर्मनीची राजधानी बर्लिनला गेले. यापूर्वी नेतांजींनी मुसोलिनी व हिटलरची भेट घेऊन भारतीय लढयास त्यांाची किती मदत मिळेल याची चाचपणी केली होती. हिटलरचा अंत्यत विश्वासु रिबेनट्रा^प याने नेतांजींचे स्वागत केले. जर्मनीतील हिंदी लोकांची सेना उभारण्याचे काम हाती घेत ३००० चे लष्कर उभारले. इंग्लंडच्या वतीने लढणाया भारतीय सैनिकांना जर्मनीने कैद केले होते. त्यांचे मन वळवुन दुसरी फौज उभारली. याचवेळी जपान युध्दात उतरल्याने पूर्वेकडे युद्ध आघाडी उघडली गेली. जपान व आशियातील हिंदींच्या मदतीने भारतास स्वातंत्र्य मिळेल असे नेताजींना वाटू लागले. याचकाळात रासबिहारी बोस यांनी जपानची राजधानी टोकियो येथे हिंदी स्वातंत्र्य लिगची स्थापना केली. अल्पावधीत पूर्वेकडील देशातील प्रतिनिधींची बैठक टोकियो येथे भरली. त्यात रासबिहारी बोस यांनी आझाद हिंद सेनेची स्थापना केली. क^प्टन मोहनसिंग यांना सेनापती पद देण्यात आले. जुन १९४२ मध्ये बँकॉक येथे भरलेल्या बैठकीत रासबिहारींनी सुभाषचंद्र बोस यांना जपानमध्ये येण्याचे आवाहन केले. त्यानुसार नेताजी निघाले. एका जर्मन यु बोटीतून अटलांटिक महासागराच्या तळातून प्रवास करत मादागास्कर बेटाच्या दक्षिणेस ४०० मैलावर येत तेथुन जपानी पाणबुडीने सुमात्रास गेले व तेथुन १३ जून १९४३ रोजी सुभाषचंद्र बोस टोकीयोस आले. जपानी पंतप्रधान टोजोने त्यांचे स्वागत केले. त्यानंतर अल्पावधीत सिंगापूर येथे त्यांच्याकडे आझाद हिंद सेनेच नेतृत्त्व देण्यात आले.

## आझाद हिंद सेना व सुभाषचंद्र बोस

नेताजींनी सेनेचे नेतृत्त्व स्विकारले. भारताच्या सशस्त्र चळवळीच्या इतिहासातील हा अंत्यत महत्त्वाचा लढा होता. सेनेच्या रूपाने इंग्रजांविरोधातील हा दुसरा सशस्त्र लढा होता. गांधींच्या अहिंसक मार्गाने भारतास स्वातंत्र्य मिळत नसल्याने त्यांनी हा मार्ग स्विकारला होता. पारतंत्र्यातून भरतीयांची सुटका हे त्यांचे मुख्य उद्दिष्ट होते. टोकियो रेडिओवरून भारताबाहेरील भारतीयांनी स्वातंत्र्यासाठी प्राणपणास लावावेत असे आवाहन केले.

## आझाद हिंद सेनेत नवचैतन्य

सेनेचे नेतृत्त्व स्विकारल्यावर सैनिकांना प्रेरणा देण्यासाठी त्यांनी स्फूर्तीदायक भाषणे केली. एका भाषणात ते म्हणतात 'आजपर्यंत आपल्याला स्वातंत्र्य न मिळण्याचे कारण म्हणजे आपण स्वातंञ्याची किंमत दिलेली नाही. प्रत्येक वस्तुला ठराविक किंमत असते. त्याचप्रमाणे स्वातंञ्यासाठी रक्तदान आवश्यक आहे. "तुम मुझे खुन दो मै तुम्हे आझादी दुंगा". 'अशा भाषणांनी सेनेत नवचैतन्य निर्माण झाले.

## राणी झाशी रेजीमेंटची स्थापना

जुलै १९४३ मध्ये नेताजी सिंगापूरला आले. तेथे रासबिहारींनी हिंदी स्वातंत्र्य संघाची व आझाद हिंद सेनेची सर्व सूत्रे नेतांजींकडे दिली. नेताजी संघाचे अध्यक्ष व सेनेचे सेनापती बनले. १२ जुलै १९४३ मध्ये पूर्व आशियातील स्त्रियांमध्ये चैतन्य निर्माण करताना नेताजी म्हणाले 'हिंदी स्त्रियांच्या शौर्याची परंपरा जुनी आहे. १८५७ च्या उठावात एक झाशीची राणी निर्माण झाली. परंतु या स्वातंत्र्य युध्दात हजारो राण्या निर्माण झाल्या पाहिजेत ' नेताजींच्या या आवेशपूर्ण भाषणाने स्त्रियांमध्ये नवचैतन्य निर्माण झाले. मोठया प्रमाणात स्त्रियांनी आझाद हिंद सेनेत सहभाग घेतला. म्हणून आझाद हिंद सेनेला जोडून २६ आ^क्टोबर १९४३ रोजी राणी झाशी रेजीमेंटची स्थापना नेताजींनी केली.

## प्राचंड लष्कर भरती व लष्करी प्रशिक्षण

नेताजींच्या आवाहनामुळे १४ ते ४९ वयोगटातील अनेकजण लष्करात भरती झाले. प्रचंड लष्करभरती नंतर ठिकठिकाणी त्यांच्या प्रशिक्षणासाठी प्रशिक्षण केंद्रे उघडण्यात आली. सिंगापूरला पहिले लष्करी केंद्र उघडले. त्यानंतर शांघाय मलाया रंगुन येथे प्रशिक्षण केंद्रे उघडली. व सेनेस बळकट मजबुत स्वरूप प्राप्त झाले.

## आझाद हिंद सेनेच्या हंगामी सरकारची स्थापना

प्राबळ लष्करी संघटनानंतर २१ ऑक्टोबर १९४३ रोजी नेताजींनी हंगामी सरकारची सिंगापूरला स्थापना केली. त्यास हिंदी स्वातंत्र्य संघ नाव दिले. हिंदी स्वातंत्र्य संघाची सर्व सूत्रे इंडियन नॅशनल आर्मीच्या हातात होती. विविध खाते निर्माण करून त्यावर मंत्री व अधिकारी वर्ग नियुक्त करून हंगामी सरकारला बळकटी प्राप्त करून दिली. या हंगामी सरकारचे पंतप्रधान सरसेनापती नेताजी सुभाषचंद्र बोस होते. प्रसिध्दी प्रचार यंत्रणा मंत्री पदावर एस. ए. अय्यर तर सचिव पदावर रासबिहारी बोस होते. सर्वोच्च सल्लागार म्हणून करिमगाणी व कायदामंत्री म्हणून एन. एस. सरकार होते. लेFटनंट कर्नल म्हणून चटर्जी यांची नेमणूक केली. सेनेच्या या हंगामी सरकारला जपान जर्मनी इटली ब्र*मदेश राष्ट्रीय चीन मंचुरिया सारख्या राष्ट्रांनी मान्यता दिली.

## आझाद हिंद सेनेची वाटचाल

हंगामी सरकार निर्मितीबरोबरच नेताजींनी जपानी सरकारच्या सा*याने इंग्लंड व अमेरिका विरोधात युध्द पुकारले. त्यावेळी सेनेतील सैन्यास उद्देशुन त्यांनी भाषण केले. 'आझाद होगा हिंदुस्थान ' ही घोषणा केली. चलो दिल्ली हे त्यांचे घोषवाक्य होते. कदम कदम बढाये जा हे त्यांचे समरगीत होते. सेनेने भारतभूमीच्या मुक्ततेसाठी सशस्त्र लढा चालू केला.

४ फेब्रुवारी १९४४ रोजी पहाटे सेना रणागंणात उतरली. स्वातंत्र्ययुध्दास सुरूवात झाली. भारत ब्रह्मदेश सरहद्दीवरील अनेक ठिकाणे जिंकून घेतली. १९ मार्च १९४४ ला सेनेने भारत भूमीत प्रवेश केला. तिरंगा ध्वज उभारून राष्ट्रगीत म्हटले. स्वातंत्र्ययुध्दाच्या सुरूवातीस सेनेने नेत्रदिपक यश संपादन केले. जपानने इंग्रजाविरोधात लढत असताना अंदमान निकोबार बेटे जिंकून आझाद हिंद सेनेकडे सुपुर्त केले त्यांना अनुक्रमे शहीद व स्वराज ही नावे दिली. इतरही अनेक ठिकाणी सेनेने ब्रिटिश सैन्यास यशस्वी लढा दिला. पराक्रमाने नागालँडची राजधानी जिंकून घेतली. इंफाळ या मणीपूरच्या राजधानीपर्यंत सेनेने यशस्वी वाटचाल केली.

**आझाद हिंद सेनेचा शेवट**

इंफाळ पर्यंत यशस्वी वाटचाली नंतर सेनेच्या पीछेहाटीस सुरूवात झाली. कारण महायुध्दाचे चित्र पालटले होते. अमेरिकेने युध्दप्रवेश केल्याने दोस्तांचे बळ वाढून जर्मनी जपान हतबल झाले. जपानला विविध आघाडयांवर पराभव स्विकारावा लागला. जपानच्या पराभवामुळे सेनेस रसद मिळणे अवघड झाले. त्यातच ६ व ९ ऑगस्ट १९४५ रोजी अमेरिकेने अनुक्रमे जपानच्या हिरोशिमा व नागासाकी शहरांवर अणुबॉम्ब टाकला. जपान शरण गेले. त्यामुळे नाइलाजाने सेनेच्या लढयाचा शेवट झाला. भारतीय स्वातंत्र्याचे नेताजींचे स्वप्न अपुरे राहिले.

**हिंदी स्वातंत्र्य चळवळीवरील आझाद हिंद सेनेचे परिणाम**

सेनेला अपयश आले तरी सशस्त्र लढयाचा राष्ट्रीय भावनेवर विलक्षण परिणाम झाला. सेनेमुळे चलो दिल्ली जयहिंद घोषणा सामान्यांना परिचीत झाल्या. कदम कदम बढाये जा सेनेचे गीत घराघरातुन गायले जाऊ लागले. सशस्त्र लढयामुळे ब्रिटिशांविषयी असंतोष निर्माण झाला. सेनेपासून स्फूर्ती घेत भारताच्या पश्चिम किनायावर नाविक दलाने बंड केले. त्यानंतर अल्पावधीत ठिकठिकाणी सैनिकी उठाव घडून आले. इंग्रजांनी सैनिकी उठावाला कंटाळुन १९४७ मध्ये भारतास स्वातंत्र्य दिले. इंग्लंडचे पंतप्रधान अॅटलींनी भारताला स्वातंत्र्य देताना म्हटले की 'ब्रिटिश हिंदुस्थानला स्वातंत्र्य देत आहे. कारण हिंदी सैन्य ब्रिटिशांशी एकनिष्ठ राहिलेले नाही. ' अॅटलीच्या या विधानावरून सेनेचे कार्य व नेताजींचे व्यक्तिमत्त्व स्पष्ट होते. सेनेचे ध्येय सफल झाले नसले तरी स्वातंत्र्यासाठी अनुकूल वातावरण सेनेने निर्माण केले. भारतीयांच्या निष्ठेवर अवलंबुन राहून यापुढे भारतात राज्य करता येणार नाही अशी इंग्रजांची खात्री झाली. त्यामुळे भारताला स्वातंत्र्य देण्याचे त्यांचे धोरण निश्चित झाले.

थोडक्यात नेताजींच्या सेनेचा पराक्रम हिंदी राष्ट्रीय आंदोलनात महत्त्वाचा मानला जातो. सेना व सेनेचा पराक्रम हेच खरे भारताचे वैभवशाली स्वातंत्र्य युध्द होते.